जागृतीच्या
नव-स्नात
अशा सृष्टीत
प्रवेश तर कर-
तुझ्या स्वागतासाठी
हात जोडून उभा
आहे ज्ञानमय सूर्य,
सम्यक् सध्देची
आभा सोनेरी-
त्या मधुगंध पवनाने
की जयात मिसळ्लेले आहेत
अनंत अनंत तीर्थकरांचे
श्वासोच्छवास-
तया पुनीत उच्छवासातून
लाभते कां शांती-
ज्या विकार-भावनांमुळे
नित्य होत असतो
कर्मांचा आश्रव-
त्या जड-निपुण
कर्म-परमाणूंचा घडत असतो
स्नेहबंध,
ममत्वाचे, मोहाचे, आपुलकीचे
ते सारे स्नेहबंध,
त्यांचा नित्य सहवास-
मग फिरत राहाते चक्र
संसृतीचे-

मग जिवाची तगमग,

त्रास, चिंता, काळज्या

ज्या सुखेनैव

राहातात तुमच्या आत्म्याशीं

बिलगून.

असे हे संसाराचे

नित्य घडणारे परिवर्तन,

तया परिवर्तनात तू

कुठे ?

भोवऱ्यात वा वातचक्रांत

सापडून

तुला तू किती दीन-हीन

बनवून घेतले-

एकदा, फक्त एकदाच

तया परमात्म्याचे

दर्शन घेण्याची आतुरता

तुझ्या ह्रदयात उठू दे.

मग पहा-

तो आश्रव,

ते सर्व कर्म-परमाणू

त्यांचा वर्षाव झाला

तरी-

एकही रमाणू कार्यकारी

ठरणार नाही-

जागृतीची हीच तर

किमया-

तया किमयेने

घडत, उकलत जाते
जीवन.
पूर्वजनमीचे बंधही
ढिले होतात-
गळून पडतात.
या आश्रवाचा,
बंधाचा
विचारही-
त्यात ही अडकू नकोस.
कशास चर्चा
त्या आश्रवाची, बंधाची, मोक्षाची.
जें सदैव तुझ्याच इायी
स्थिर रुपाने, नित्य विद्यमान,
जे सदैव स्वत-तेजे
विलसत राहाते, तुझ्यात
तयासाठी केवळ हवी-
एकच कृती-
अंतर्प्रवेशाची -
आत्म-संलीनतेची.
कृती, कार्ये, उठाठेवी
चळवळी,
कितीकदांक केलया,
आहे तयाची का गणती?
ज्याला जीवन म्हणतोस
त्याची अशी दुरवस्था-
अंतरंगात डोकावण्याचे
धाडस, साहस

एकदा तरी?

त्या अंतर्मनांत

लपून बसलेलया आहेत

विषारी क्रोधादिकांच्या

भयाण नागफणा-

अहंकार, ईर्षा, असूया, दंभ

यांनी ते अंतर्मन

किती काळोखले-

किती घृणित, पतित-

अंतरंगात ने एकदा

तो आत्म-प्रकाश-

त्या प्रकाशाने

जळून जाऊ दे

ती सर्व अवांछनीय घाण-

रोग लपवून, दडवून

का कुणी ठेवतात?

त्या पूर्वबध्द कर्म-मलांचा

हिशोब करत कसा आहेस?

ते कर्मबंधाचे, कम्रनाशाचे

काल-गणित-

ते गणित एखाद्या

सहस्त्र विळख्यांचे-

आत्मदर्शन

गरुडाच्या एका आवाजाने

गळून पडतील ती बंधने

त्यांना असेल काळाचे बंधन,-

त्यांना असेल गणित-शास्त्राचे

समर्थन-

पण ते सारे कर्मबंध,

नाश पावू शकतात क्षणार्धांत,

असा शक्यतेचा बोध,

त्या परम-बोधाचे कमळ

उमळू दे, त्या

आत्मदर्शनाने

: ६३ :

त्या गवळ्या सारखी-

तुझी मती, तुझी गती, तुझी रती-

तो घालत जातो दुधात पाणी-

आणि धारणा-

जणु ते दूधच-

दुधाशी एकरुपता-संबंध,

दिसतो, असत नाही-

हीच तर फसगत-

तसेच तुझ्या मधु-मधुर

जीवनात

मिसळले जाते

क्रोधादि कषायांचे

अज्ञानमयीभावनांचे

पाणी-

आणि मग,

भ्रमित होते,

तुझी बुध्दी,

तुझी धारणा, संकलपना-

वाटते तुला,

हा क्रोध माझा, हे विकार माझे,

हे विश्व माझे, राज्य माझे-

आणि मग एकेदिवशी

तू फेकला जातोस

पद-पथावर-

गलितगात्र, म्लान, दुःखी,

कष्टी, विपन्न, केविलवाणा.

-----------

पक्व फळ,

पडते गळून ...

एकाकी, असंबध्द, असहाय्य-

पुन: ते त्याच

झाडावर विलसू शकत नाही-

ते संच,

जी कर्मे, कर्मफळे

उदित होऊन, राहून, गळून

पडतात-

ती न पुन:

बध्द कर आत्मदेवा.

ते सारे कर्म

अनात्म, अचेतन, अ-कार्यकारी

त्यांचा स्वभावच तसा,

त्यांच्यात असते,

तेही कधी नष्ट होत नाही-
अशी जी उदासीनता-
ते सारे पर-द्रव्य, पर-पदार्थ
स्वत:च असत-स्वयंभू
त्यांचेही परिवर्तन,
त्यांच्याच स्व-बळे.
कम्र हे अचेतन,
ते कधी कां सांगती
रस चाख माझा,
साथी हो माण-
तसे सांगणे-करणे-असणे
त्यांच्या निसगंप्रवृत्तीत ही
नाही.
संगत सुटता,
प्रीती तुटता,
त्या परश्रितपणची-
तू मग,
एक शाश्वत,
ज्ञानमय मूर्ती
ज्याच्या बळावर
तू फिरतोस
या संसार चक्रंत-
ते बळ परकयांचे?
हे, तर तुझेच.
तूच होशी-कधी अज्ञानी
जाणता वा नेणता-
अन् मग भ्रमत राहातोस

मन मानेल तसा-

लोह-चुंबक,

तो कां सुईला म्हणतो-

ये, माझ्याकडे आकर्षित हो,

लाह-चुंबकाचे गुणधर्म-

सुईचे गुणधर्म

खरे तर वेगवेगळे.

तसेच क्रोधदि विकारांचे परमाणू

तुम्हास आमंत्रण देत नाहीत.

दोन भिन्न स्वभावांचे,

जीव-जड-पदार्थ-

परंतु दोष जीवात-

अज्ञानमय परिवर्तनाचा,

पराश्रय स्वीकारण्याचा,

पुरुषार्थ जागृत न करण्याचा.

त्या अज्ञानमय,

तिमिरातून तुझा

ज्ञानसूर्य बाहेर पडू दे

तिमिराशी का तुझे भांडण?

तिमिर केवळ, एक नकार-

प्रकाशाचा

तू स्वयं-दीप हो,

स्वयं प्रकाशित हो,

मग तिमिराची चिंता कशाला ?

तुझ्या कर्तृत्वसंपन्न विचारात-

देखील अज्ञानच,

झळकते, प्रकाशते.

कर्तृत्व-करण्याचे नव्हे

कर्तृत्व केवळ असण्याचे,

जथे उभा आहेस,

तेथूनिच साद घाल,

त्या ज्योतिर्मय परमात्म्याला.

त्या परमात्म्याला

घतलेली साद

सारे भव-तिमिर-

भय-तिमिर

नाशून टाकेल.

ती सादच तुझ

दीप होऊन जाईल.

-------------

सारे कर्म-कर्तृत्व,

जणु

ढेकळे-

मातीची-

ती पदे, ते सन्मा,

ती सर्व अहंकार प्रसवणारी

साधने-

सारी मातीची ढेकळे-

कालची सुकृते-दुष्कृते-

आजच्या आशा, आकांक्षा, स्वप्ने

तीही सारी मृत्तिकेचे सांगाती.

त्यावर, त्या ढेकळावर

वर्षला जर का ज्ञानमेध

विरघळून जाते

त्यांचे रुप-अस्तित्व.

तैसेच हे तुझे

शरीर-

सुंदर, सौष्ठवयुक्त रससंपन्न,

लावण्यमय.

अंग-प्रत्यंगातून रसरसलेले

ते तारुण्य-

दिवस ढळता-

ढळते कांती, तेज, तप सारे.

वळतान सारे पराक्रम,

लालसा वैभवाची,

संपन्नतेची

अहं बनून जातो एक ढेकूळ-

जीर्ण मृत्तिकेच्या.

-----------

सारे रंग

चमकणारे, रुपवान रंग,

आकर्षक, मोहविणारे

फिकेपडून आतात,

एकेदिवशी-

ते सर्व रंग फिकट,

कहाहीन, विशोभित-

तसेच परस्पर्शित रुंग,

रुप, शरीर, यौवन
सारे कसे होऊन जाती
कळाहीन, अवांछनीय.
ज्या देहासाठी-
काय काय करायचे
शिल्लक नव्हते-
सारे बाह्यविश्व
तयाच तनु-लतेचे
गोडवे गात होते-
सारा साज-शृंगार,
सारी महफिल,
सारे महाल, रेखीव, सुंदर, मनोहारी
साऱ्यांचे रंग उडून गेले.
आले होते रणांगणांत
कौरव - पांडव,
निर्णय घ्यायचा होता-
कोण खरे,
कोण खोटे?
कोण बलशाली-कुणाहून.
राजे, सम्राट, चक्रवर्ती
सरसावून तरवारी, आयुध
त्यांनीही अल्पकाळ
गाजविली सत्ता-
अहंमनयतेची-
तख्त, तिजोरी, तरवारीचे
तीन घोडे सरसावीत-
काय उपलब्धी ?

काळ तसाच मख्ख-
दुनियाही तशीच-
काय उरले आहे,
त्यांच्या कार्याचे ठसे-
साऱ्या कर्तृत्वाला एकच
रंग-
अज्ञांनाचा.
सारा इतिहास कतृंत्वाचा
उडी घेई अज्ञात-तमांत-
कुणी संशोधक बिचारा
जुळ्वत राही तुकडे
बांगड्यांचे, मडक्यांच
माखलेले मातीने.
असे जडत्वाचे
लेणे तयालेले विशव-
त्या विश्वात
कोण कुणाचा,
कोण हितैषी वा शत्रू
उपकर्ता कोण, कोण अपकारी
सारेच अनाकलनीय-
अशी ही मैफल
जड-अजडाची,
चेतनेची-अचेतनेची
खेळ्तात डाव
सारीपटाचा.
खेळणारे सतत बदलत जातात
सारीपट जणु चिर-अस्तित्वात.

अनेक जाती-ममातीची,
धर्म पंथांची, भिन्न भिन्न
देशांची, भाषांची, संस्कृतींची
तेथे होते, हार-जीत
हारलेले
जिंकलेले
निघून जातात
त्यांचा ठाव-ठिकाणाही
इतिहास विसरुन जातो.
सारे कर्तृत्व, भोक्तृत्व,
नेतृत्व
विलीन होऊत जाते
त्या महान अस्तित्वांत.

पिकून पडलेल्या
कोणत्याही पानांचा
झाडाशी काय संबंध- ?
तोंडातून बाहेर पडलेले
शब्द ...
तेही तसेच-
केलेले कर्म, कृती, कार्य
त्या कर्त्या पासूनही
तसेच वेगळे-
म्हणून असे नाही वाटत
की कर्म, कर्त्यापासून

नित्य वेगळे;
कर्त्याच्या ठायी
कर्म, वा
कर्माच्या ठायी कर्ता,
हे असंभवच
यासाठी,
असे नाही का दिसून येत
की ज्ञानमय आत्म्याच्या,
सर्व किया ज्ञानमयच-
पाण्यापासून
निर्मिलेल्या बर्फात
पाण्याहून असे वेगळे काय?
जडांची निर्मिती जडापासून,
ज्ञानमयतेत केवळ
ज्ञानमय भावच
सर्व निर्मितीत तोच,
अनन्य, दृढ, अविचल.
हेच तर परम अस्तित्व
त्या सर्वश्रेष्ठ, व्यापक
अस्तित्वात ज्ञानमयतेविना
काही नसे.

---------

त्रैलोक्यात्मक,
अशी ही रंगभूमी-
चैतन्याच्या अंगी

अनंतानंत कला-
अभिव्यक्ती करते ते चैतन्य
जडाचे सहाय्य घेऊन-
मग रंगभूमी सजते,
विविध रसांच आविष्कारानें-
नृत्य आहे, पदन्यास आहे,
आवेश, निवेश, परिवेश
सारे आहेतृ
शब्द जड ते,
चिद्‌रुप धारण करुन
वावरतात मुक्तपणे
त्या रंगमंचावर-
आणि प्रेक्षकांच्या मनांत
सुष्त असलेलया
विविध रस-भावना
आकाराला येतात-
हास्य रौद्र, कारुण्यरुपाने.
जोष, जल्लोष, सदन, क्रंदन
गीत, संगीत
सारे हातात हात घालून
निर्मितात एक चमत्कारितक
सृष्टी-
अगदी सत्य वाटावी अशी-
त्या सृजनशीलतेत
एकरुप होतात सारे प्रेक्षक
वेभन, एकरुप.
हसतात, नाचतात, गातात,

ताल धरतात,

हरखून जातात

लक्ष लक्ष प्रेक्षक-

ती सारी पात्रे

बोलतात, गातात,

येतात, जातात

त्या दिग्दर्शकाच्या तालावर

त्यांचे त्या समर्पणांत

ते उरत नाहीत-

असतो तो केवळ,

दिग्दर्शक.

ऐसा हा संसार

मांडतो प्रत्येक जीवन,

जीव ओतून

जगण्याच्या कल्पनेत

हरवून बसतो सारे जीवन.

तत त्याचे काय असते,

हे विस्मृत-

अशी विस्मृती स्व-पणाची

स्वयंभूपणाची,

स्व-नेणिवेची-

तेच तर अज्ञान-

स्वत:ला न विसरता,

स्वत:ला न हरवता

स्वत-चेतनेच्या अनिर्वचनीय

चिदानंद स्नरुपाचा प्रत्यय-

ती आनंदमयता,

न हरविता --

जगता येते केवळ

ज्ञानात्मक रीतीने

ज्ञानमय राहून.

जे होणार, ते होणारच

असेल तर,

तुमची चिंता उद्याची,

भविष्याची,

तुमची धावपळ, उसासे, शोक

सारे व्यर्थ.

तुम्ही त्या पररुप असणाऱ्या

महा प्रवाहात-

त्या प्रवाहाहून तुम्ही

नित्य वेगळे,

हीच भावना-खरी.

हे जे तटस्थतेचे

निरुपमरुप-

अमेय, निर्भयरुप-

हाच तर भूतार्थ-

भूत-हितार्थ ही हाच.

त्या एकत्वरुप

अंतरंगीच्या परमात्म्यात,

हेच सारे नियत, निश्चल

अविचल तादात्म्य.

त्या ज्ञान-चैतन्यरुप

तादात्म्या पलिकडे जे,

ते सारे अस्पर्शित

स्पर्शू शकेअशी त्या
जडत्वाची पात्रता-
ती ही नाही.
जेथे कांही कर्तृत्व नाही,
जेथे कांही तुमच्या
ज्ञानवान परमात्म्याला
करायचेच नाही,
तेथ्ा एक,
परम आश्रयस्वरुपाची
तटस्थता-
जीवाभवाची, सुशांत,
शरणरुप तटस्थता-
त्या तटस्थतेत-
विरुन जातील साऱ्या
विकार-विचार-संकल्पना.
तेंच तर या सर्व विश्वाचे
सत् स्वरुप-
तीच या ब्रह्यांडाची
अधिसत्ता-
प्रत्येक पदार्थ
आप आपल्या सत्तेत
स्वत्वरुप.

: ६९ :

काय घेऊन बसलास
ती वेद-पुराणे. आगमे,

वचने ती सत् पुरुषांची-
ते तर एकेकाळी पेटलेले दीप होते,
आणि त्या प्रकाशांत
वाटचाल केली होती
त्या काळच्या मानव समाजाने
परतुं,
आता वेगळा मनु.
वेगळे वारे, वेगळे सारे
कुठे घेऊन जाता ती
ओझी ..
व्यर्थ भारवाही तू.
आत्महित दक्ष,
केवळ तुझी प्रज्वलित
कांतिमान, स्व-पर प्रकाशी
तुझी दृढ श्रध्दा-
केवळ तुझ्या परम चैतन्याबरच.
त्या श्रध्देच्या,
भक्तीच्या,
आंतरिक तींव ओढीच्या
प्रकाशात वाटचाल
हीच तुला परमात्म्याप्रत नेईल.

: ७० :

आत्म्याच्या
ज्ञान-दर्शन गुणवरील
तुझी अप्रतिम, अप्रतिहत श्रध्दा

जेवहा जेव्हा कमी होते,

तेवहा पुनः तू

स्वं ला सोडून

अन्य भावस्वरुपांत

रमतोस,

तोच तुझा अधःपात.

कमा्रश्रवाचे तीव्रतम

वादळ उठते मनात.

त्या वांदळांत

सापडतो तू-

अन् पुनः

परिभ्रमण अगतिक-

त्या तुझ्या ज्ञान गुणाच्या

भ्रष्टतेतच साठवला

आहे आश्रव-

कम्रपरमाणंचा-

जागरुकता हवी,

संलग्नता हवी

निजरुपात-

रमण्याची,

ते परम सुंदर रुप

डोळ्यांत साठविण्याची.

जो पर्यंत लक्ष्य-वेध

होत नाही-

तो पर्यंत

नित्य निरावरण

राहाण्याची

तुझी आंतरिक ओढ हवी.

: ७१ :

अंकुरलेल्या त्या,

श्रध्देची मनोहर रुपे

पाहाण्यात तू दंग-

मग कुठे,

तुला कर्माश्रव-

निरिच्छ हृदयांत,

मोहाची बीजे

अंकुरत नाही,

अन् मग घडत राहाते

आत्मदर्शन,

इच्छाविरहित.

आकांक्षारहित,

निर्विकल्प चिंतांत

घडून येतो

आत्मानुभव.

येत राहिलेत

विकार-वासनांचे

कु-चक्र

तरी तू अनाहत,

अबध्द, अस्पर्शित

नितय,

जसा भव हृदयी जागृत

तशीच घडे कृती-

त्या परम-प्रेमस्वरुप

आत्मदेवात-

सामावून जाणारी,

एकरुप होणारी

तुझी अलौकिक

आत्मरति,

तीव्रतर होत जाते-

आणि उरतो,

केवळ तूच.

हे एकलेपणाचे लेणे

ते तुझे समाधि-आसन,

त्या आसना पलिकडे

तू ना रमे.

नित्य जपली तू

एकाहंची भावना,

त्या एकलेपणांतच

उगवले चांदणें

अमृताचे.

ज्ञानं द्रष्टव्यं,

ज्ञानं ध्यातव्यं

ज्ञानं एब अनुचरितव्यं

चा उद्‌घोष

सतत उठत राहिला-

तर,

तर त्या दिव्य चिंतनाने

येत जावे

अपार सामथ्य-

ते सामर्थ्यच
तुणा याटाड्या होतो,
तुझ्या मार्ग-क्रमणांत-
कैवलयाच्या
प्रांगणांत
उतरण्याचे क्षण
त्या ज्ञान साधनेने
जयळ येतात,
अन् मग बहरुन येते
आगळे चमत्मारिक
विश्व-कैवल्याचे.

: ७२ :

आत्मशक्तीचे
ते बल-स्थान-
जेथे परिघावरच
उभे राहातात-
वासना-विकार-
आणि तू केवळ
बनतो,
तया सर्वांचा ज्ञाता.
त्या तीव्रतर वासनांच्या
जातकुळी,
त्यांचे फोल सामर्थ्य
अनुभवास येते,
केवळ आत्मानुभवाने.

येऊ दे त्या
मोहाच्या महा अस्त्रा,
येऊ दे विविध
प्रलोभनांच्या प्रभावळी,
कुविचारांचे समूह
मोह-सिक्त विचारांचे वादळ वारे,
काय करतील ते
तुझ्या ज्ञानमय,
सत्वशील, जाज्वलय
आत्मरतीचे.
तम-तिमिरांच्या
अनंत राशीच्या राशी
एका ज्ञान-किरणने-
समूळ नष्ट-
शत्रूंचे सामर्थ्य मोठे
हा विचारही तसाच
क्षुद्र.
सारा क्रम आहे,
गणिता सारखा
त्या जड-परिवर्तनाचा.
त्या परिवर्तनाची दिशा असते,
एक-
हे तसेच घडावे, राहावे, बदलावे.
त्या पर पर्दाािच्या
परिर्तनात-
तू कुठे?
तुझ्या भोवती पसरले आहे

विश्व, जड परमाणूंचे-

कर्मरुप होण्याची,

तुझ्या भावभवनांशी

ससगी करण्यासाठी-

तरी मूलतःते उदासीनच.

उदासीन. निर्मम

अशी ती कर्म-परमाणूंची

जातकुली-

सर्वस्वी वेगळी

तुझ्या ज्ञानमय रुपाहून.

कशासाठी

स्मरण, चिंतन, त्या

परपदार्थांचे ?

पेटता ज्ञान-वन

प्रखरतेने-

तीव्रतर दाह त्या

ज्ञानाग्नीचा-

साहू ना शकती

ते कर्म परमाणू-

अंतरंग त्यांचे,

भोग ते देत ना

उपभोग त्यांचे रुप ना,

निरुपीाोग्यरुप त्यांचे,

ते न करती

धात, कारण

शक्ती त्यांची ती नसे.

पूर्वजन्मीचे जरी कांही,

संचित असे,

सत्ता त्यांची उदयकाळी,

आज त्यांचे बळ नसे.

: ७४ :

कोवळी कळी-

एखाद्यावेलीवरची

उपीाोगय नाही

ती जशी;

कच्चया फळांना

रस नसे, रुचि नसे

तैसे असे

पूर्व-बध्द संचित.

त्या संचिताचे रुप

केवळ कोवळे.

कां व्यर्थ चिंता

त्या संचित कर्मांच्या

फलोदयाची?

होणार, ते होणार आहे,

जाणार, ते जाणार आहे

कां मगन त्या चिंतेत तू?

तू रहा साक्षी सदा,

ध्यान-चिंतनी

अप्रमादी-

क्रिया-कर्मे

कितीही घडली-

हिंसक-अहिंसक, पापरुप.
तरीहि त्याच्यामध्ये
नित्य शोभे ज्ञानमयता.
ज्ञानमय त्या चिंनी,
कम्र प्रत्यय नष्ट की.

: ७५ :

ज्या जिनाचे,
नाव घेशी-
तो,
जिंकूनी अज्ञानभवा
ज्ञानरुपेचि उरे
क्रोधाग्नि वा अहंभावा
दुष्ट कपटी प्रवृत्ति वा
लोभ संचय उदय असला
तरी ही तो
मुक्त की.
त्या मुक्त जिनाचे
स्मरण म्हणजे
तुझ्याच आत्म्याचे स्मरण,
चिंतन, पूजन
तो जिनच
सांगतो,
तुम्ही ही सारे अंतरंगी जिन
मिका स्वत:ला केवळ,
पराची चिंता नको-

जाणा स्वत:ला ज्ञानमय,

राहा तयातच स्थिर असे,

तेच तुमचे रुप आहे,

तेच केवळ लक्ष आहे.

: ७६ :

आकाशांत भरुन आलेले

काळे-किभन्न मेघ

वर्षत राहातात,

उदासीनपणे,

निर्हेतुकपणे.

त्यांच्या बरसण्यांत

इच्छा, आकांक्षा नाही-

ती एक सृष्टीची क्रमबध्द

अवस्था.

ते कां येतात?

कुठून येतात?

कां बरसतात?

केवळ अहेतुक.

भाव-भानानांचा,

ज्ञानमयतेचा

त्यांच्या ठायी नसतो

किंचित्‌चाही भाग.

धरित्रीलाही ठावे नसे,

हे अनवरत बरसणारे मेघ

कां बरसतात-

बरसतात तर बरसू दे-
वाहू दे नद्या-नाले
उद्दंड पणे
लक्ष-लक्ष धरांची नासाडी,
विनाश दरवर्षी घडून येतो-
तो कां?
कोण त्यांचा प्रेरक?
तसेच बरसूदे क्रोध, मान,
अहंकार-मोहांचे काळे मेघ-
तू रहा अविचल, स्थिर-
कारण तेच तुझे स्वरुप.
आणि वाहून जायचे असेल
त्या आक्राळ-विक्राळ
विकारांच्या पुरांत-
गटांगळ्या खात-
तर तोही तुझाच
निर्णय-
सर्व निर्णयात्मकता
तुझ्यात-
आणू नकोस कुणा
देव-देवतांना,
ब्रम्हा-विष्णु-महेश्वरांना
या तुझ्या सवयं निण्र्यात-
सारी चराचर सृष्टी
एकतेने, निष्ठुरतेने
निर्ममत्वाने-उदासीन.
अनेक राजसत्ता आलया-गेल्या.

सूर्य-चंद्र केवळ ज्ञाते-

ते अनवरतपणे प्रकाश

देत राहिले-

अहेतुकपणें-स्वाभाविकपणे.

उदासीन.

जे जागे झाले

त्यांनी प्रकाशांत

स्नान केले-

अमृतत्वांत रमले, रंगले, आनंदले.

परि सूर्य तसाच उदासीन.

तटस्थ, माघ्यस्थ,

आणि मूक-ध्यानस्था.

त्याच्या कृतीतून

कुणी संबोधि कां

अंगिकारली नाही?

स्थीरत्वाचे एक सौंदय्र आहे,

अ-चलत्वाचे एक

मनोहारी, दृष्ट लागेल असे

रुप आहे-

ते रुप न्याहाळायला

लागते एक बळ

ज्ञातेपणाचे-

अत्पत्ति-विनाशाच्या

महाचक्रात

शाश्वत रहातें,

ते स्थिरत्व,

ते शाश्वतपण.

तीच तर अनादिची

महासत्ता-

तुमच्या अवांतर, आगंतुक

विनाशी सत्तेला

जमानतोच ?

हे सृष्टीचे अविरत

चालणारे, फिरणारे

चक्रथांबविण्याचे

सामर्थ्य-

अनेकांनी कर्ण होऊन

त्या सृष्टीच्या महारथाचे

चक्रथांबिण्याचे प्रयत्न

केले.

पण स्थिती, प्रकृती, अनुभागाचे

सदैव फिरत राहूनही

स्थिर राहाण्याची-

नष्ट होतानाही स्थिर-

उदयकालीही स्थिर-

जणु त्या स्थिरत्वाची रुपे

आहे-नाही-अनिर्वचनीय

असे त्याचे अविनाशी

रुप.

मी केवळ ज्ञान,

केवळ ज्ञान,

तेच माझे स्थिर, अचलरुप
हा भाव
उदित होता,
प्रकटते सामर्थ्य आगळ.
लोपतो रस सारा,
संसार विभ्रमांचा.
देऊन कां टाकीत नाही
तुझी संमती-
उमटव तुझी समती मुद्रा-
घडू दे, सर्व परिवर्तन,
यथारुप.
सांग, मी गुंतणार नाही
या,
नित्य, निर्मन, कठोर वज्रासारख्या
उदासीन पर पदार्थाच्या
मोहमयी माया जालात.
संपतात सारे खेळ-ममाशे
त्यांचाही एक काळ असतो,
एक भ्रम-विभ्रम असतो,
चमत्कार असतो-
तुम्हास गुंतविण्याचा
पण तुम्हीही फारसे
गुतत नाही-
चालू लागता, पुढे
खे संपता-
पुन: ती जागा
ओसाड, विराण, शून्य

पूर्वी सारखीच.

-----------

येणाऱ्यांना येऊ द्यावे,
त्यांचे खेळ पाहात राहावे.
आगमन अन् निर्गमन
पट्टिका जणु स्थानकावरची.
येतात गाड्या भरभरुन
जाता तशच-
परि जसा स्थानक-प्रमुख
त्यांच्या आगमन-निर्गमनांत
ना गुंते.
तैसेचि रहावे, निर्विकलप,
उदासीन.
त्याने गळे अहंता
ना उरे रस आता
आवागमनाचा.
तैसेच करु नये
चिंता, जन्म-मरणाची
दोन क्षण, पुरेत त्यांना
त्या क्षणासाठी
का गुंतता.
सृष्टीक्रमाची ही मालिका
आकळेना कोणासी-
जीवनाचा हेतु?
तोच तर अहेतु

उदासीन, अ-स्पुस्ष्ट,
अनादिचा.
केले विवेचन परांचे
त्यांच्या स्थित्यंतरांचे
कितीही आगमांतरी-
तरी ते अपूर्ण,
अनिर्वचनीय
आकळेना.

: ७९ :

टंच सोने,
मिश्र त्यात कांही नसें,
तेच शुध्द-
तैसे विशुध्द ज्ञान भाव,
त्यांत नसे मिसळला
अज्ञान भाव-
ते आत्मज्ञान-
जेथे पराचा आश्रय,
तेथे अशुध्दता तत्पर
म्हणून स्वत:चे अवलंबन
शुध्द मनी.
करा कितीही विचार
अनेकांत वा सापेक्ष
तेथेही नसे
विशुध्दता-परसाक्षेपे.
नसे विधि, तसे निषेध

नसे पक्ष वा पक्षांतर
विचार नसे, नसे आचार
असता केवळ स्थिती
ज्ञानमयतेची.
किती शब्द-शबदांतराची
जाळी-जहमटी-
आनुभवाचा कोळी
मट्ट करती सद्भावा-
नको ते शब्दांचे जजाळ,
आणि नको ते विकल्प-जाळ
हेतु-अनुमानाचे.
जे सिध्द ते असिध्द
जे असिध्द ते सिध्द
सत्य ते असतय,
असत्य ते सत्य
होतसे हेतु अनुमानी.
हरते ना मनाचे जाड्य,
बुध्दीचे खेळही तैसे.
जे जाड्यतेत रमे
ते सारे ज्ञानमय नसे.

: ८० :

उदित होता
ज्ञानमयता-
राहे चित्र अनाकुल.
जैसे कमळ चिखलात ही,

कमळ ना करे चिंता
चिखलाची;
ते स्व-रुपी, स्व-गंधी
रमेले, रंगले आनंदी.
तोच निजानंद जाणा
जो रमवी पर-रुपी.
स्वानुभूतीच्या स्वरुपी
एकरुप.
रागादिमुक्त-मानस त्याचे,
तो रमे एकत्वी, निज अनुभवांत
त्यास सिध्दी कैवल्याची.
कैवल्य तर त्याचे रुप
ते आंतूनच स्वयें प्रकटे
त्यासी न लागे कलंक
त्रिकाली.
ऐसी बुध्दि ज्याची
तोची आक्रमी वाट
कैवल्याची.

: ८१ :

कलिका, एक गुलाबाची
तोंड किंचित् गुलाबी
दाखवित सांगते
ही मी इथे.
रुप माझे प्रगट
अंतरी, भावगंधही अतरी

थांबा जरा,

मग पहा मी,

उमलते माझ्या सवे-

कंटकांच्या सोबतीला

पर्ण सारे सोबतीला

परी मी त्यांची होई कधी?

ज्ञानधन आत्म-कलिका

प्रस्फुटे-

अंतरीचे भावगंध

उधळती चोहीकडे.

कां त्राण तूं त्रस्त तं

दीनवाणें पाहतों

शोध रुपा अंतरंगी

जे न आहे बाहरी,

रुप सारे ज्ञानमय ते

गंध सारे ज्ञानधन ते

सहज ज्ञायक तू असा कि

भव सारे रे तुझे.

भुलुनिया तू बाह्यरुपा,

बाह्य गंधा-

भ्रमसी तूं भ्रमरापरी.

अंतरंगी शेध घे तू

जेथ, वैभव नित्य राही

ते नित्य,

सारे रुप तूं.

ज्ञानमय तू असा की
तीन्ही जगाला जाणसी-
ते जाणणे वा नेणणे
यातही तू ना राहसी.
सम्यक्त्व सुंदर
तत्व सारे,
जे असे केवळ तुझे.
त्यात रम तू,
जाण त्याला,
हो अरुपी नित्य की
निज रसातच
डुंबुनी तू,
तादात्म्य रुपच
होतसे.
ज्ञानधन तू,
चिन्मय असे,
नित्य झळके
रुप ते.
चेतना झाली खरी,
स्वामीरुपा अधिक अज्वल,
जी शोभते निजपदी
ज्ञान राहे ज्ञान रंगी,
अन्यासवे ते राहिना.
होवो किती ही,
विध्वंस सारा,
राहो कितीही

वैभव पसारा

तायत तू राहीच ना.

----------

तुझ्या भाव-विश्वांत,

दोन बिंदू, एक-रुपे-

पुण्य ते वा पाप आहे,

नित्य

पाढा वाचतो.

पाप अथवा पुण्य

याचा,

उलगडा कधि होई कां?

कां व्यर्थचि शोधतो

रुप त्याचे,

जे न आकळे सर्वथा.

ज्ञानमय तू सदा की

त्यात नाही

पुण्य अथवा पाप रे

मोहमय तू असा कि

पाप-पुण्या चिंतसी-

भेद सारा चिंतनी-

असशी तू नित्य, नियमित

त्या कलपनाहुनी वेगळा

कम्र ते मग,

शुभ असो की अशुभ, सारे

त्यागणे-निश्चय असा-

हेचि हृदयी धर सदा कि
तू वेगळा साऱ्याहुनी.

--------

जाण त्या तू बंधनांना
जे बांधती तुज सर्वथा
जकडुनी ठेवून तुजला-
भ्रांती करिती
की सुखाची-
बंधनी तुज सुखवितांना
लाज त्यांना ती नसें-
गोड वाटे
कुरवाळिता त्या बंधनांना-
क्रीडताना, स्पशंताना, भोगताना
प्रेम वाहे, जणु झरा-
क्षणिक सारे भोग असता
त्या जाणतो तू आपुले-
भोगादिकांच्या मत्त प्रवाही
वाहतो तू पतितसा-
मत्त होशी, चित्त धरसी
वित्त मानी त्याजला-
वरवरुनी तू भेगशी
एकरुपा होऊनी-
ते न करती प्रेम तुजशी
ते निरंतर वेगळे.
त्यांचे निराळे विश्व आहे

गुणही त्यांचे वेगळे

ते भोग वाटें, विष परंतु

जे जकडते बंधनी-

स्वामीपणा तो भ्रमनी तुजला,

जे न हेती

कधी कुणाचे-

धावसी मागे त्यांच्या

-------

स्नेह जाळी की स्वत:ला

वातही त्याच्या सवे-

स्नेह बंधन, मोह बंधन

बंधनी तू मुक्त रे!

बांधल्या मोळी कितीही

लाकडे ना बध्द होती-

अग्नि तयातील

मुक्त राही बंधनी-,

पेटता अग्नी तयातिल

बंधने ती खाक होती-

बंधनाची भीति कसली

ती न बांधी तब-गुणा

गुण रुप सारे मुक्त असते

देह बंधन वा असो.

देव पुजले,`दह पुजले

रुप सारे दो घडीचे-

ते न देती,

देऊ शकती

जे नसे त्यांच्या निके

कडु लिंब वृक्षा तू

आम्र मागे

तो होतसे खिन्नसा-

मागणारा कांही न मिळ्ली-

तो भिकारी जाण रे

मिळ्ते, मिळू दे-

जाऊ दे, जे जातसे

हाती तुझिया

सामर्थ्य नाही

जे नष्ट, ते रोकण्या-

व्यर्थ करिशी, यत्न सारे

जे विनाशी त्या राखण्या-

विश्व सारे पानझड की-

ते बदलते रुप सारे-

जे गोजरे की असुंदर

त्यामध्ये पुरुषार्थ कसला?

गळून पडते पक्व सारे

येतसे फुलोरा नवा-

नवनवे चैतन्य रुपा

विश्वदावी. त्यापहा-

नूतनाच्या आगमी

वा जीर्ण जाता कोसळूनी

त्यात पाही रुपसत्ता

लोचनी-

----------

नेत्र हीना विश्व कैसे-

रुप, आकार-घनता तशी

सारी एक अंधार यात्रा-

यात्रेत त्या तो

काय पाही-

कल्पना तू करुनी पाही.

अंधारमय ते विश्व त्याला

परि अंतरंगी विश्व दुसरे-

तुज पाशी आहे

नेत्र-

सजग

परि त्या अंधता तू देतसे.

एकदा तरी-

शांत होऊन-

न मौन होऊन-

अंतरंगात तरी डोकव-

केवळ डोळे आहेत म्हणून-

केवळ त्यांना बाह्य विश्वरुप

दिसते म्हणून-

तू नेत्रवान ठरत नाहीस-

पशूंनाही डोळे असतात-

तेही त्या नेत्रांनी पाहातात-

पण ते डोळे खरे नाहीत-

जे केवळ,

आपल्या इच्छांनाच पाहातात,

जे केवळ भेगानाच जाणतात,
जे केवळ वस्तंचे बाह्यरुपच
जाणतात-
ते डोळे भ्रामक-
ज्या नेत्र ज्योतीने-
अंतरंगीची दिव्य रत्ने
अंधारातील
ती ज्योत, खरी नव्हे-
काय पाहातो आहेस
त्या नेत्रांनी-
निसर्ग नियमांनी बध्द
असे आगळे-वेगळे रुप,
सौंदर्य म्हण हवे तर.
वस्तूना न पाहता तू
आपल्या वासना,
आकांशा, महत्वाकांक्षा
वा स्वपने तर पाहात नाहीस?

: ८७ :

तू स्वामी ...
त्या स्वामीस्वाचे कवडीमोल-
गुलाम होऊन
मागत बसलास
भीक, त्या वासनापूर्तीसाठी-
ज्याचा स्वामी तू
त्या नोकरांचा तू दास-

त्या दासत्वाचा ही

तुला अहंकार-

हे तुझे वैभव, संपननता, तारुण्य

यांचा ही तू दास-

दासांचा दास होण्यात

पराक्रम तो काय?

ज्यांची निर्मिती केली

ती त्याच क्षणी संपली-

ती निर्मिती केवळ

विरंगुळा-

त्या निर्मितीत तू नवहताच-

त्या निर्मितीकडे पाहूही नकोस-

कारण-

कारण ती तुझा स्वीकार नाही करीत-

त्याची याद ही ठेवू नकोस-

ज्यांने निर्मिला ताज महाल

तो कुठे--?

ज्यांनी उभारली साम्राजये-

ती माणसे कुठे-?

ती आज पाहायला नाहीत

त्यांच्या साम्राज्यांची धूळ

हे त्यांचे भाग्य-

उरतेच काय इथे-

ज्यातून उभरली जातात

साम्राज्ये-

ती धूळ नित्य आहे-

तुमच्या निर्मितीत

विनाशचा गर्भ
अ जाणताच पोसला जात असतो-
त्या विनाशाच्या गर्भाची
हत्या करण्याचे
सामर्थ्य तुझ्यात नाही-
तुझी निर्मिती क्षणिक-
विनाश शाश्वत-
जे नष्ट होणार नाही-
ते कदाचित आवडणार नाही,
जो प्रवास संपत नाही-
त्यांचा कंटाळा-
प्रवास संपतो त्याचा
आनंद-
प्रयासासाठी बाहेर
पडतानाच्या
आनंदाहून भेष्ठ-

: ८८ :

असे सांगतात-
त्याने निर्मिला एक प्रसाद
करोडो पयांचा-
जणु बरसले होते सौंदर्य
स्वर्गीय त्या महालावर-
सारे चकित त्या निर्मितीवर ...
आणि त्या निर्मात्याने-
मग-

एकेदिवशी पेटवून दिला
तो महाल-
तयाला पाहायची होती-
विनाशाची निर्मिती-
विनाशाच्या निर्मितीतही
तो दक्ष, सावधान-
दोनच तर बिंदू-
एक निर्मितीचा
एक विनाशाचा-
त्याला हवा होता-
पहायचा होता-
तिसरा शाश्वत बिंदू-
ज्याच्या सहाय्याने, अस्तित्वानें
हे दोन नेत्र पाहात
असतात-
विनाश आणि निर्मिती-
ते दोन्ही बिंदू खरे नव्हते-
तो त्या शाश्वताचा भ्रास होता-
शाश्वततेची लीला-
शाश्वततेचा तो एक खेळ-
समुद्राच्या लाटा नाही तोच
खेळ खेळत-
अखंडपणे-
उपजतात लाटावर लाटा
आणि खडकावर आदळून
सांगून जातात-
या सृष्टीचे अनोखे, अविचल सत्य-

उत्पती-विनाश देन्हीही
शाश्वत नही..
तो एक शाश्वतपणाचा खेळ-
जादुगाराच्या पोकळ डब्यातून
कबूतर कधीच ज्रन्म घेत नाही-
पण तो चमत्कार पाहून
तो खोटा खेळ पाहून
आम्ही टाळ्या वाजवून
पाहात असतो-
तसेच असते सारे...
जन्म-मरणची कबुतरे-
निघत जातात त्या
जादुगराच्या पोकळीतून-
आपण चकित-
जे
स्थिर, अनादि-अनंत-अविचल-
ते
खेळ दाखवित राहाते-
असा खरा वाटणारा-जादूचा खेळ.
अणू होगो मोठा-
आकाशा एवढा
आणि गिळून टाकतो
त्रैलोक्य जणु.
एक कण मेंदूचा
ठेवतो असंख्य स्मृती-
सांभाळून-
जाणून धेण्याची पराकष्ठा

करतो विश्वाला.

आणि एकेदिवशी

तो कण धारातीर्थी पडतो-

विरुन जातात साऱ्या स्मृती-

मधाच्या विशाल पोळ्याचे छत-

जणु केवळ माशांचे घर-

असंख्य माशा-मधमाशा-

दिसत नाही मध कधी-

त्या देखील खात नाहीत कधी तो मध.

कशासाठी गोळा करतात

तो मध-

हेच तर विश्वाचे कोडे आहे.

साठवतात धन, संपत्ती, माया-

काया सरते सरपणावर-

ती माया कुणी तरी घेतो-

आणि त्याचीही तीच गत-

हा जणु शाप त्या लक्ष्मीचा

सर्प होऊन काळ

बसतो, त्या अशाश्वत

चिरविनष्ट तुमच्या

आशा-आकांक्षांच्या राशीवर.

-